**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवणार

- भारत ऊर्जा सप्ताहाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने उद्घाटन

- सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केंद्रसरकार चौफेर प्रयत्न करीत असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला पदक तालिकेत दुसरं स्थान

**आणि**

- ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्धक्याने निधन

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर असून आज ते फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवतील. प्रधानमंत्री मोदी काल पॅरिसला पोहोचले तेव्हा विमानतळावर फ्रान्सचे संरक्षणमंत्री सेबास्टियन लेकोर्नू यांनी त्यांचं स्वागत केलं. फ्रान्समधला भारतीय समुदाय देखील मोदी यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येनं उपस्थित होता. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी भारत-फ्रान्स द्विपक्षीय संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने फ्रान्सच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करणार आहेत.

फ्रान्समधल्या ऐतिहासिक मार्सेली शहराला प्रधानमंत्री भेट देणार असून तिथल्या पहिल्या भारतीय वाणिज्य दूतावासाचं उद्धाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. त्याशिवाय उभय देशांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या थर्मोन्युक्लिअर एक्सपरिमेंटर रिॲक्टर प्रकल्पाला ते भेट देतील. तसंच पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैनिकांना मजारग्यूज युद्ध स्मशानभूमीत श्रद्धांजली अर्पण करतील. फ्रान्सचा दौरा आटोपून प्रधानमंत्री बुधवारी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर रवाना होणार आहेत.

**<><><><><>**

देशाची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता ३२ पटीने तसंच जीवाश्मेतर इंधन निर्मिती क्षमता तिप्पट वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. द्वारका इथं आजपासून सुरू झालेल्या भारत ऊर्जा सप्ताहाचं प्रधानमंत्र्यांनी आज दूरदृश्यप्रणालीद्वारे उद्धाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते. पॅरीस जी-२० कराराचं उद्दिष्ट साध्य करणारा भारत पहिला देश असल्याचंही ते म्हणाले. गेल्या दशकभरात भारताच्या अर्थव्यवस्थेने दहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली असंही प्रधानमंत्री म्हणाले. जगभरातले देश भारताचा गौरव करत असल्याचं प्रधानमंत्री मोदी म्हणाले....

**होल्ड बाईट मोदी**

**<><><><><>**

लोकसभेच्या कामकाजाचा अनुवाद यापुढे डोगरी, बोडो, संस्कृत, उर्दू, मैथिली, मणिपुरी या भाषांमधेही करण्यात येईल, अशी घोषणा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज केली. आतापर्यंत हिंदी आणि इंग्रजीसह

मराठी, बंगाली, मल्याळम, तमिळ आदी दहा भाषांमध्ये कामकाजाचा अनुवाद केला जात होता. एवढ्या सगळ्या भाषांमधे कामकाजाचं भाषांतर करणारी भारताची संसद ही जगातली एकमेव संसद असल्याचं बिर्ला यांनी सांगितलं. २००२ मधे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत ७ लाख ७२ हजार किलोमीटर रस्ते बांधण्यात आल्याची माहिती केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री कमलेश पासवान यांनी दिली. लोकसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. या योजनेमुळे एक लाख ६३ हजार वस्त्या पक्क्या रस्त्यांनी जोडल्या गेल्या, असं त्यांनी सांगितलं. या योजनेच्या चौथ्या टप्प्यात २५ हजारांहून अधिक वस्त्या रस्त्याने जोडण्याचं उद्दिष्ट आहे, असंही पासवान यांनी सांगितलं.

<><><><><>

देश कमकुवत असेल तर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकत नाही, असा भारताला विश्वास आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. एअरो इंडिया २०२५ परिषदेत संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीला ते आज संबोधित करत होते. जगभरातल्या वाढत्या संघर्षामुळे अनिश्चितेत भर पडत आहे. नवीन सत्तासंबंध, नवीन शस्त्रास्त्र, राज्यसंस्थेतर शक्तिंचा वाढता प्रभाव यामुळे जागतिक व्यवस्था अधिक नाजूक झाली आहे, असं राजनाथ सिंह म्हणाले. त्याचप्रमाणे सीमा सुरक्षा आणि अंतर्गत सुरक्षा व्यवस्था यातील फरक पुसट होत चालला आहे, सायबर अवकाश आणि बाह्य अवकाशाची परिमाणं सार्वभौमत्वाच्या रुढ व्याख्येला धक्का देत आहेत, असंही ते म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज युनानी दिनानिमित्त दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन कऱणार आहेत. प्रसिद्ध युनानी चिकित्सक हकीम अजमल खान यांच्या जयंतीनिमित्त आज ११ फेब्रुवारी हा दिवस युनानी दिवस म्हणून साजरा केला जातो.

<><><><><>

महाराष्ट्र विधीमंडळात प्रथमच निवडून आलेल्या सदस्यांसाठी नवी दिल्लीत संसद परिसरात विधिमंडळ कार्यपद्धती प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे; या कार्यक्रमाचं उद्घाटन काल लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्या हस्ते झालं. राज्य विधीमंडळाच्या सदस्यांनी शून्य तास, प्रश्नोत्तर तास यांसारख्या संसदीय प्रक्रिया प्रभावीपणे वापराव्यात आणि सभागृहात सक्रिय सहभाग घ्यावा, असं आवाहन बिर्ला यांनी यावेळी केलं. या प्रशिक्षणाचा समारोप आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

<><><><><>

सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकार चौफेर प्रयत्न करत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्ली इथे सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे या विषयावर गृहमंत्रालयाच्या संसदीय सल्लागार समितीच्या बैठकीत ते बोलत होते. सायबर गुन्ह्यांनी भौगोलिक सीमा पुसून टाकल्या असून त्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकार अभिसरण, समन्वय, संवाद आणि क्षमता यांच्यावर भर देत असल्याचं शहा यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश डिजिटल क्रांतीचा साक्षीदार होत असताना, सायबर सुरक्षा मजबूत

करण्याला गृहमंत्रालयाचं प्राधान्य असल्याचंही ते म्हणाले. तसंच, सायबर गुन्हे रोखण्यासाठीच्या 14-सी हेल्पलाईन क्रमांक १९३० या क्रमांकाविषयी जनजागृती करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी समितीच्या सदस्यांना केलं.

<><><><><>

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त आज देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. गृहमंत्री अमित शहा, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा आणि इतर नेत्यांनीही आज नवी दिल्लीत पक्ष मुख्यालयात त्यांना श्रद्धांजली वाहिली. भारतीय जनता पक्षानं पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

देशांतर्गत सराफा बाजारात सोन्याच्या दरानं विक्रमी उच्चांक गाठला आहे. या वाढीमुळे आज २४ कॅरेट सोने ८७ हजार रुपयांच्या तर २२ कॅरेट सोने देखील ८० हजार रुपयांच्या पातळीवर पोहचलं आहे. दिल्लीच्या सराफा बाजारात आज २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ८७ हजार २२० रुपये तर २२ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ७९ हजार ९६० रुपये इतका आहे. मुंबईच्या सराफा बाजारात आज २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ८७ हजार ७० रुपये तर २२ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ७९ हजार ८१० रुपये इतका आहे.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने पदक तालिकेत दुसरं स्थान पटकावलं आहे. महाराष्ट्राकडे सध्या सर्वाधिक

१२९ पदकं असून यात ३३ सुवर्ण, ४८ रौप्य आणि ४८ कांस्य पदकांचा समावेश आहे. सेनादलं ४९ सुवर्ण पदकांसह पहिल्या स्थानावर असून कर्नाटक ३२ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><><>

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्धक्याने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेले काही दिवस रुग्णालयात उपचार सुरु होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक आणि नंतर परभणी इथल्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य पदाची जबाबदारी सांभाळणारे बोराडे यांचा ‘पेरणी’ हा पहिला कथासंग्रह १९६२ साली पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. त्यांची ‘पाचोळा’ ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय ‘तलफ’, ‘बुरूज’, यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या होत्या. ग्रामीण भागातल्या गरीब सर्वसामान्य माणसाला त्यांनी आपल्या कथांमधून जिवंत केलं. त्यांच्या कथांमधली पात्रं ठसठशीतपणे वाचकांच्या समोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपटही प्रसिद्ध झाले आहेत.पाचोळा या कादंबरीसाठी तसंच मळणी या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्गमय निर्मितीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. गेल्या आठवड्यात राज्य शासनाने विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही बोराडे यांना जाहीर केला होता. बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

//<><><><><><>//